महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३०७ वा | दिनांक : ०६/१०/२०२५ | वार : सोमवार

# उद्धव ठाकरे मी म्हणेन तेच खरे असे वागतात - शंभुराज देसाई




**सातारा :** राज्याचे पर्यटन मंत्री आणि शिंदे गटाचे नेते शंभुराज देसाई यांनी शिवसेनेच्या चिन्हावरून आणि मुख्यमंत्रीपदावरून सातत्याने भूमिका मांडणाऱ्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर आज सडकून टीका केली. घटना आणि कायद्याने दिलेले अधिकार मान्य न करता "मी म्हणतोय तेच खरं," असा पवित्रा घेणे योग्य नाही, तसेच माझ्या मनात मुख्यमंत्रीपदाचा कोणताही विचार नव्हता, या उद्धव ठाकरेंच्या वक्तव्यावर शंभुराज देसाई यांनी टीका केली. उद्धव ठाकरे हे फक्त आपल्यासोबतच्या सहकाऱ्यांना थोपवून धरण्यासाठीच अशी विधाने करत असल्याचे ते म्हणाले.

शंभुराज देसाई यांनी आज साताऱ्यात प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, उद्धव ठाकरे हे अडीच वर्षे राज्याचे मुख्यमंत्री राहिलेले आहे. राज्य हे बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या घटनेवर आणि संविधानावर चालते. संविधानाने आणि घटनेने काही यंत्रणांना घटनेने निर्माण केलेले अधिकार बहाल केलेले आहेत. पक्षाच्या आणि पक्षाच्या चिन्हांसंदर्भातला निर्णय घेण्याचे अधिकार संविधानाने केंद्रीय निवडणूक आयोगाला दिलेले आहे. शिवसेना पक्षाचा आणि धनुष्यबाण चिन्हाचा निर्णय घटनेने दिलेल्या अधिकाऱ्याच्या चौकटीत दिलेला आहे. काही लोकांनी त्याविरोधात न्यायालयात जाण्याचा प्रयत्न केला. पण न्यायालयाने सुद्धा त्यामध्ये हस्तक्षेप केला नाही. असे असताना ते मान्य करायचे नाही आणि मी म्हणतोय तेच खरे असे कुणी म्हणत असेल, तर ते योग्य नाही.

उद्धव ठाकरे हे सातत्याने चिन्ह आणि मुख्यमंत्रीपदाबाबत बोलत आहेत, यामागचे कारण सांगताना देसाई म्हणाले की, उद्धव ठाकरे यांच्यासोबत राहिलेल्या सहकाऱ्यांना आधार देण्यासाठी, तसेच त्यांच्यातील काही मंडळी विचलित होऊन एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात येऊ नयेत, यासाठी त्याला थोपवण्यासाठी केलेले हे वक्तव्य आहे.

2019 च्या विधानसभा निवडणुकीनंतरच्या राजकीय घडामोडींवरून देसाईंनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीकास्त्र सोडले. "माझ्या स्वप्नात मुख्यमंत्रीपदाचा विचार नव्हता," या उद्धव ठाकरे यांच्या विधानावर आक्षेप घेत देसाई म्हणाले, स्वप्नात वाटले नव्हते असे उद्धव ठाकरे म्हणाले असतील, मात्र, आम्ही त्याचे साक्षीदार आहोत. 2019 मध्ये भाजप-शिवसेना युतीला बहुमत मिळाल्यानंतर शिवसेनेच्या आमदारांच्या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी आमच्याकडे बोट दाखवून, 'मला तुमच्यातील मुख्यमंत्री करायचा' असे म्हटले होते. "तेव्हा ते असे बोलले आणि आठ दिवसांत असा काय बदल झाला की, स्वतः मुख्यमंत्रीपद घेतले? याचा अर्थ आता ते जरी म्हणत असले की माझ्या स्वप्नात नव्हते, तरी तेव्हा 'तुमच्यासारख्या शिवसैनिकाला मुख्यमंत्री करेन' असे आमच्यासमोर का म्हटले? नंतर स्वतः मुख्यमंत्री का झाले?" असा थेट सवाल देसाईंनी विचारला.

## आरक्षणवादी जनतेला सोबत घ्या, सवर्णांना मतदान करू नका - प्रकाश आंबेडकरांचे आवाहन



**पुणे :** ओबीसी लढ्याचे नेतृत्व धनगर समाजाने हाती घ्यावे, अशी भूमिका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मांडली आहे. आगामी निवडणुकीत ओबीसीने आरक्षणवादी जनतेला सोबत घेऊन निवडणूक लढवावी, असे मत प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केले. तसेच सवर्णांना मतदान करण्याऐवजी एससी-एसटी उमेदवारांना आणि ते नसतील तर मुस्लिमांना मतदान करावे, असे आवाहनही प्रकाश आंबेडकर यांनी केले. धनगर समाजाचे राज्यस्तरीय अधिवेशन आज पुण्यात पार पडले. या अधिवेशनात प्रकाश आंबेडकर सहभागी झाले होते. या अधिवेशनानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी आपली भूमिका मांडली.

राज्यातील मराठा आरक्षणाच्या वादानंतर आता मराठा आणि ओबीसी समाजातील तणाव पुन्हा उफाळून आला आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी मनोज जरांगे यांनी सातत्याने केल्याने ओबीसी समाजात नाराजी पसरली असून, त्यांनी या निर्णयाचा तीव्र विरोध सुरू ठेवला आहे. धनगर समाजाच्या आरक्षणासाठी 15 दिवसांपासून उपोषण करणारे दीपक बोराडे यांनी प्रकृती खालावल्यामुळे 2 ऑक्टोबर रोजी उपोषण मागे घेतले. याच संदर्भात बोलताना प्रकाश आंबेडकर यांनी धनगर समाजाने आता ओबीसींच्या या लढ्याचे नेतृत्व करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

धनगर समूहाने हे लक्षात घ्यावे की, धनगर हा लढाऊ समाज आहे. धनगर समाजानेच आता ओबीसींच्या लढ्याचे नेतृत्व घ्यावे, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले. ओबीसींना महाराष्ट्रात सध्या 27 टक्के आरक्षण आहे, पण तेलंगणासारखे राज्य हे प्रमाण 62 टक्क्यांपर्यंत नेऊ शकते, तर महाराष्ट्रातही ते शक्य आहे. त्यासाठी धनगर समाजाने राजकीय नेतृत्व घ्यावे आणि विधानसभेची सत्ता हस्तगत करून आरक्षण वाढवावे, तेव्हाच समाजाला न्याय मिळेल, असेही प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले.

आंबेडकर पुढे म्हणाले, ओबीसी समाजाने राज्यसत्तेवर हक्क मिळवला पाहिजे. आता लोकांनी मतदान करताना विचारपूर्वक निर्णय घ्यावा. जर ओबीसी उमेदवार नसेल, तर एससी आणि एसटी उमेदवारांना मतदान करावे. तेही नसतील तर मुस्लीम उमेदवारांना मतदान करावे. सवर्ण समाजाने दीर्घकाळ अन्याय केला आहे; त्यामुळे ओबीसी लोकांनी या सवर्ण उमेदवारांना मतदान करू नये असे मी त्यांना आवाहन करतो. आपली सगळ्यांची सामाजिक आणि राजकीय ओळख आता ओबीसी म्हणूनच झाली पाहिजे. या सगळ्यांना एकत्रित आणलं पाहिजे. सगळ्या समाजाने एकत्र येऊन त्याची ओळख ओबीसी झाली पाहिजे.

# ७० लाख एकर नुकसान, तरीही मदतीचा प्रस्ताव नाही:मुख्यमंत्री दिल्लीला गेले, गृहमंत्री आले... पण मदत नाही, शरद पवारांचे सरकारवर टीकास्त्र



**पुणे :** राज्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतकरी उद्ध्वस्त झाला असताना, केंद्राकडून अद्याप मदत जाहीर न झाल्याने ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी एक मोठा दावा केला आहे. केंद्राकडे मदतीसाठी संपर्क साधला असता, महाराष्ट्र सरकारकडून नुकसानीचा अंतिम प्रस्ताव अद्याप आलेलाच नाही, असे मला सांगण्यात आले, असे शरद पवार यांनी म्हटले आहे. त्यामुळे राज्य सरकारने तातडीने प्रस्ताव पाठवून शेतकऱ्यांसाठी मदत मिळवावी, अशी मागणीही त्यांनी केली. शरद पवार म्हणाले की, मुख्यमंत्री दिल्लीला जाऊन आले, केंद्रीय गृहमंत्री राज्यात दौऱ्यावर आहेत, पण मदत जाहीर होत नाही. मी केंद्राशी बोललो असता, त्यांनी राज्याचा अंतिम प्रस्तावच आला नसल्याचे सांगितले. त्यामुळे राज्य सरकारने यात दिरंगाई न करता लवकरात लवकर प्रस्ताव सादर करावा. सप्टेंबर महिन्यात विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. कृषी मंत्र्यांच्या माहितीनुसार, राज्यात सुमारे ७० लाख एकर वरील पिकांचे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी जमिनी खरवडून गेल्या, घरे पडली आणि पशुधनाचे ही मोठे नुकसान झाले. शेतकरी एकरी ५० हजार रुपयांच्या मदतीची मागणी करत असताना, सरकारच्या पातळीवर मदतीचे घोडे अडल्याने नाराजी वाढत आहे.

शरद पवार यांनी ऊस उत्पादकांकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी रक्कम घेण्याच्या निर्णयावर तीव्र आक्षेप घेतला. ते म्हणाले, शेतकरी स्वतः मदतीच्या प्रतीक्षेत असताना, त्यांच्याकडूनच सक्तीने वसुली करणे अत्यंत चुकीचे आहे. आम्ही याविषयी मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालून या निर्णयाचा फेरविचार करण्याची विनंती करणार आहोत. साखर कारखान्यांच्या बैठकीत याविषयी चर्चा करून राज्य आणि केंद्राशी संवाद साधला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शरद पवार म्हणाले की, राज्यातील शेतकरी आज अतिशय बिकट परिस्थितीत आहे आणि त्याला आधार देणे हे सरकारचे नैतिक कर्तव्य आहे. सरकार पिकांच्या नुकसानीची भरपाई देऊन आर्थिक मदत करू शकेल, पण ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीच वाहून गेल्या आहेत, त्यांचे पुनर्वसन कसे करणार? हा एक मोठा 'यक्षप्रश्न' आहे.अशा प्रकारचे नुकसान महाराष्ट्रात यापूर्वी कधीही झाले नव्हते. त्यामुळे फक्त सर्वेक्षण करून थांबणे उपयोगाचे नाही, तर प्रत्यक्ष आर्थिक आणि भौतिक मदतीची गरज आहे. शरद पवार म्हणाले की, अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे, या संकटात शेतकऱ्यांना त्वरित मदत आणि भरपाईची गरज आहे. मात्र, केवळ नुकसान भरपाई देऊन प्रश्न सुटणार नाही. ज्यांची उपजीविकेचे साधन असलेली जमीनच राहिली नाही, त्या शेतकऱ्यांसाठी सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांच्या पुनर्वसनाची सोय केली पाहिजे. सरकारने याकडे गांभीर्याने पाहून लवकरात लवकर मदत जाहीर करावी.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०६ ऑक्टोबर २०२५


## शासनमान्य ग्रंथ यादीत लक्ष्मण वाल्डे यांच्या कविता संग्रहास स्थान



**कन्नड (अरुण थोरात) :** राज्य शासनाने नुकत्याच प्रकाशित केलेल्या शासनमान्य ग्रंथांच्या यादीत कन्नड चे 'बहुरंगी' युवा कवी लक्ष्मण वाल्डे यांच्या बहुरंगी या कवितासंग्रहास स्थान मिळाले आहे.महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने त्यांच्या बहुरंगी या कविता संग्रहास नवलेखक अनुदान योजनेत अनुदान देत प्रकाशित केला होता. आता शासनाने त्यांच्या या कविता संग्रहास शासनमान्य ग्रंथ म्हणून मान्यता दिली आहे. त्यामुळे हा कविता सर्व शासकीय व शासन मान्य ग्रंथालये, वाचनालयात, वाचकांना वाचनास मिळणार आहे. हरहुन्नरी युवा कवी लक्ष्मण वाल्डे यांनी आता पर्यंत शेकडो कविता, गीते, लेख, लिहीले असून विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले आहे. राज्यभरातील कविसंमेलनांत ही त्यांचा सहभाग असतो. त्यांच्या कविता, लेख, गीतांत माय, माती, माणुस, निसर्ग, प्रेम, ग्रामीण जीवन, महिला, उपेक्षितांच्या वेदनांचा समावेश असतो. याबद्दल त्यांचे भाषा साहित्य संस्कृती संशोधन परिषदेचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विजयजी भोसले, विधिज्ञ ॲड. कृष्णा पा.जाधव, डॉ. रमेश सुर्यवंशी, डॉ. अंबादास सगट, डॉ. प्रतिभा अहिरे, रामचंद्र झाडे, रंगनाथ लहाने, सागर जाधव, परिषदेचे संस्थापक तिफणकार डॉ. शिवाजी हुसे, ब्रम्हगिरी गोस्वामी, भगवानराव लहाने, ज्ञानेश्वर गायके, प्रवीण दाभाडे, श्रीराम दापके, सुरेश आटे, संदिप वाकडे, भिमराव सोनावणे, अरुण थोरात, अनिता राठोड, शुभदा देवरे, गीतांजली गजबे, आर्दीनी अभिनंदन केले आहे.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## विश्वकोश मंडळातर्फे रविवारी नोंदलेखन कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ आणि दयानंद महाविद्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्था, नागेश्वरवाडी येथे "भूविज्ञान लेखकांची नोंदलेखन कार्यशाळा" उत्साहात संपन्न झाली.कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राजशेखर बालेकर (अध्यक्ष, अखिल भारतीय ग्रंथकार संघटना) डॉ. सतीश देशपांडे (सदस्य, महाराष्ट्र लोकसेवा आयोग), तसेच मा. डॉ. पी. एस. कुलकर्णी (संपादक, भूविज्ञान नोंदलेखन कार्यशाळा) उपस्थित होते.या कार्यशाळेत विश्वकोशीय लेखन प्रक्रियेत अभ्यासकांचा सहभाग वाढविणे, मराठी भाषेत विज्ञानविषयक लेखनाची दृष्टी विकसित करणे आणि भूविज्ञानासारख्या विषयातील तांत्रिक संकल्पना सुलभ भाषेत मांडणे यावर भर देण्यात आला.कार्यशाळेत प्रा. डॉ. एस. के. वडगबाळकर व श्री. मोहन मद्वाण्णा यांनी विश्वकोश नोंदीचे महत्त्व, विज्ञानविषयक कोशीय लेखन तंत्र आणि नोंदलेखनाचे विविध टप्पे यावर मार्गदर्शन केले. सहभागी अभ्यासकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्रश्नोत्तर सत्रात सक्रिय सहभाग नोंदवला.कार्यक्रमाच्या शेवटी गटचर्चा, अनुभवविनिमय व समारोप सत्र पार पडले. मार्गदर्शक म्हणून मा. डॉ. यु. डी. कुलकर्णी, मा. प्रा. आरती बरीडे, मा. डॉ. सुधाकर पंडित, मा.डॉ.पी.एल.साळवे,मा. डॉ. अजित वर्तक आणि मा. डॉ. अरविंद आवटी यांचे मार्गदर्शन लाभले.यावेळी कार्यक्रमाकरीता महाराष्ट्र भरातून आलेल्या भूवैज्ञानिक,भू-शास्त्राचे प्राध्यापक ,विद्यार्थी उपस्थित होते.याप्रसंगी कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे विद्याव्यासंगी सहायक रवींद्र घोडराज यांनी सर्वांचे आभार मानले.कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. कैलास आहेर,डॉ.शरद गायकवाड,डॉ.संदीप सिरसाठ, डॉ. सुरेन कांबळे,डॉ.योगेश वगदे,गणेश नलावडे यांनी परिश्रम घेतले.

## भारंबातांडा येथे नेत्र विकार निदान, उपचार व शस्त्रक्रिया शिबीर संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** भारंबातांडा ता.कन्नड येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधी तसेच धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हा प्रशासन आणि शासकीय मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल (घाटी) यांच्या समन्वयाने नमो नेत्र संजीवनी स्वास्थ्य अभियाना अंतर्गत नेत्र विकार निदान, उपचार व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. अनेक रुग्णांना मोफत उपचार, औषधे तसेच शस्त्रक्रियेसाठी प्राधान्याने नोंदणी करण्यात आली. वृद्ध रुग्णां सोबत तरुणांनी ही मोठ्या संख्येने लाभ घेता आला. या शिबिराचे आयोजन भाजप कन्नड तालुकाध्यक्ष गणेश दादा घुगे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हा सचिव काकासाहेब आडे, तालुका उपाध्यक्ष संदीप अण्णा जाधव, भाजपा युवा मोर्चा अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष परवेझ शेख, उपसरपंच संजय हरचंद राठोड, सचिन जाधव, समाधान राठोड, तंटामुक्ती समिती अध्यक्ष रविंद्र राठोड, ताराचंद राठोड, सुखदेव राठोड, आशासेविका सविता राठोड, अंगणवाडी सेविका सुगरणबाई चव्हाण, यांचे सह महिला, पुरुष गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित रुग्णांनी या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०६ ऑक्टोबर २०२५


## प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलमध्ये पालक मेळाव्यात विविध विषयांवर चर्चा




**मुरूम (सुधीर पंचगल्ले) :** येथील प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलच्या सभागृहात शनिवारी (ता. ४) रोजी पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी एस. एस. हुळळे होत्या. यावेळी अजहर इनामदार, माजी मुख्याध्यापक सच्चिदानंद अंबर, मुख्याध्यापक अनुराधा जोशी आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी प्रा. डॉ. पुरुषोत्तम बारवकर , संगमेश्वर लामजणे, धनराज हळळे, विरेंद्र लोखंडे, सुभाष धुमाळे, पंकज पाताळे, सागर मंडले, नेहा माने, शितल घोडके, अश्विनी क्षीरसागर, सोनाली कारभारी, तनुजा जमादार , प्रभावती कलशेट्टी, साधना शेवाळकर, गीता सत्रे, सरस्वती जाधव, सरोजा सारणे, सुधाराणी पाटील, श्रीदेवी मंडले, पुजा मरबे, साक्षी देशमाने, जास्मिन मुल्ला आदींनी परिश्रम घेऊन विविध विषयांवर चर्चेत सहभाग नोंदवला. प्रास्ताविक इंदिरा व्हट्टे यांनी केले. पालक व शिक्षक यांच्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती, शिस्त, खेळ, सांस्कृतिक उपक्रम तसेच डिजिटल शिक्षणाच्या योग्य वापराबाबत सविस्तर चर्चा झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार जगदीश सुरवसे यांनी केले.

## श्री गोरक्षनाथ महाराज पालखी सोहळा संपन्न



**फुलंब्री :** फुलंब्री, तालुक्यातील खामगाव नाथाचे येथे ग्रामदैवत गोरक्षनाथ महाराज मंदिरात नवरात्रोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. दि. ०४ आक्टोबर शनिवारीरोजी रात्री ९.०० वाजता ग्रामदैवत श्री गोरक्षनाथ महाराज यांची पालखी निघाली. या वेळी गावातील भाविकांनी आपल्या घरासमोर रांगोळी काढली. गोविंदा, गोरक्षनाथ महाराज कि जय च्या गर्जनेने परिसरात वातावरण भक्तिमय बनले. भजनी मंडळी नी अभंग, भारुड, गवळणी सादर केल्या. व्यवसाय निमित्त बाहेर गावी असलेले गावातील नागरिक या वेळी गावात दाखल होतात. आरती करुन पालखी सोहळ्याची सांगता झाली, या वेळी जिल्हाभरातून भाविक भक्त दाखल झाले होते. गोरक्षनाथ उत्सव समिती, भजनी मंडळ, सर्व गावकऱ्यांची उपस्थिती होती

## सिद्धार्थ महाविद्यालयामध्ये स्वागत समारंभ जल्लोषात संपन्न




**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** सिद्धार्थ ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालयामध्ये आज प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ मोठ्या जल्लोषात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू सन्माननीय डॉ. विजय फुलारी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे प्रकुलगुरू सन्माननीय डॉ. वाल्मीक सरवदे आणि संचालक प्रा. सुनील मगरे व डॉ. चारुलता मगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोहर वानखडे हे होते.कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयातील द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे फुल देऊन स्वागत केले. तसेच विविध मनोरंजनांचे डान्स , पेपर नृत्य, कपल डान्स, रॅम्प वॉक, असे विविध प्रकारचे फनी मनोरंजनाचे कार्यक्रम घेऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. प्रास्ताविकामध्ये प्रा सुनील मगरे म्हणाले, सिद्धार्थ महाविद्यालयाचे २००८ मध्ये सुरू केलेले छोटेसे रोप फक्त एक अभ्यासक्रम होता आज या महाविद्यालयामध्ये सर्व प्रकारच्या पदवी अभ्यासक्रम आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहे आज हे छोटेसे रोपटे मोठे वटवृक्ष होऊन या छत्रपती संभाजी नगर मध्ये सुरू आहे या महाविद्यालयात सर्व प्रकारच्या सुविधा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. सन्माननीय कुलगुरू महोदय म्हणाले, मी प्रथमतः या महाविद्यालयामध्ये कार्यक्रमाच्या निमित्ताने आलेलो आहोत आणि एवढी मोठी विद्यार्थी संख्या बघून मला खरोखर या संस्थेचा अभिमान आहे. शून्यातून सुरू झालेलं हे महाविद्यालय मोठ्या प्रमाणावर सर्व सुख सुविधा देऊन चालू आहे आणि या महाविद्यालयामध्ये रेगुलर नियमित वर्ग होतात हे खरोखर प्रशंसनीय आहे. मा. प्र कुलगुरू सरवदे यांनी आपल्या मनोगतात सांगितले या महाविद्यालयाचे संचालक सुनील मगरे हे फार मेहनती आहे. त्याचप्रमाणे , या महाविद्यालयाचे प्राचार्य हे सुद्धा अनुभवी आहेत. त्यामुळे या महाविद्यालयाची प्रगती होत आहे .शेवटी अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. मनोहर वानखडे म्हणाले आमच्या महाविद्यालयामध्ये संस्थेच्या अध्यक्ष यांनी सर्व प्रकारच्या सुविधा देऊन महाविद्यालयाला पुढे नेण्याचे कार्य केले आहे. आज महाविद्यालयांमध्ये सर्व प्राध्यापक नेट, सेट आणि पीएचडी झालेले आहे. तसेच महाविद्यालयांमध्ये नियमित वर्ग होत असतात. महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी अहोरात्र परिश्रम करून महाविद्यालयाला C++ हा दर्जा प्राप्त करून दिला त्याबद्दल मी सर्व प्राध्यापकांचे कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतो. आणि सन्माननीय कुलगुरू महोदयांनी संपूर्ण मराठवाडा फिरून परीक्षा विभागाला वैभव प्राप्त करून दिले त्याचप्रमाणे हजारो विद्यार्थी सेट आणि नेट व पीएचडी झालेले नोकरी पासून वंचित होते अशा शिक्षकांना विद्यार्थ्यांना संपूर्ण मराठवाडा मधील संस्थांना अनिवार्य करून तज्ञ आणि पीएचडी झालेल्या शिक्षकांना नोकऱ्या मिळून दिल्या त्याबद्दल मी त्यांचे खूप खूप अभिनंदन करतो. आणि विविध संस्थांचा दर्जा यामुळे वाढलेला आहे. आणि सर्व संस्थांमध्ये रेगुलर क्लासेस सुरू झालेले आहे. ही संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अभिमानाची बाब आहे.या कार्यक्रमाचे संचलन डॉ. पूजा गिरी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. शीलवंत गोपनारायण यांनी केले .या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry , MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्टोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०६ ऑक्टोबर २०२५


## जंगलात क्रिकेट

क्रिकेटचे सामने
जंगलात सुरू झाले
लहान मोठे प्राणी
खेळायला आले

अंपायर कोल्हयाने
लगेच इशारा केला
तेव्हाच कुठे
खेळ सुरु झाला

पहिल्याच फटक्यात
माकड मारे छक्का
पण हत्तीच्या सोंडेला
बॉलचा लागला धक्का

घायाळ हत्तीची
दुखू लागली सोंड
माकड मनात म्हणे
कसली आली धोंड?

रागावलेला हत्ती
माकडाच्या मागे धावे
माकडाला पडला प्रश्न
आता काय करावे?

माकडाने मारली मग
झाडावर उंच उडी
हात जोडून म्हणाला
पुन्हा करणार नाही खोडी

तेव्हाच कुठे हत्तीचा
राग शांत झाला
उडी मारून माकड
पुन्हा खेळायला आला


**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## एक चिमणी अंगणात

एक चिमणी अंगणात
दाणे चार शोधू लागली
सिमेंटच्या जंगलात
मातीला पारखी झाली

पूर्वी कसं गावाकडं
अंगण शेणामातीचं होतं
पाखरांना खेळण्यासाठी
आभाळाचं घर होतं

मातीमध्ये चिमण्यांची
रोज अंघोळ चालायची
ओंजळभर दाणे माय
त्यांच्यासाठी टाकायची

आता घरात माय अन्
अंगणात चिमणी नाही
सिमेंटच्या या जंगलात
मायेची ती ऊब नाही

आता अंगण नावाला
जगणं चुकलं आहे
माय माती माणसाला
घरपण मुकलं आहे



**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड
मो.९४०३३८४८८९



## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात ऐ. डी. श्रॉफ स्मृती वक्तृत्व स्पर्धा रंगली.




**जालना :** दि. १८ सप्टेंबर २०२५ रोजी, फोरम ऑफ फ्री एन्टरप्राईजच्या वतीने आयोजित वी ५९ ऐ.डी. श्रॉफ स्मृती वक्तृत्व स्पर्धा महाविद्यालयात उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेत विद्यार्थी त्यांच्या विचारांना वक्तृत्वाच्या माध्यमातून मांडत होते. या स्पर्धेचे विषय: १. भारताला जागतिक उत्पादन केंद्र बनवूया.२. नोकरी शोधणारे नव्हे तर नोकरी निर्माण करणारे हीच काळाची गरज.३. आपले शिक्षण आणि कौशल्य उद्योग विश्वाच्या मागण्यांशी सुसंगत आहेत का?असे होते. एकूण आठ विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण आणि स्पष्ट वक्तृत्वामुळे उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.यावेळी बहुसंख्य विद्यार्थ्यांनी स्पर्धकांचे वक्तृत्व अनुभवण्यासाठी मोठी उपस्थिती नोंदवली.या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. संदीप पाटील, डॉ. प्रियदर्शन भवरे आणि प्रा. विलास भुतेकर, यांनी परिक्षण केले. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे: प्रथम पारितोषिक: शेख शाझिया फझलुद्दीन (B.Com FY)द्वितीय पारितोषिक: धनगर पल्लवी रामकिशन (B.A.S.Y)तृतीय पारितोषिक: परिदा शगुन मनोज (B.Sc T.Y.)चतुर्थ पारितोषिक: कान्हेरे गोवर्धन गणेश (B.Sc F.Y.)पाचवे पारितोषिक: एखंडे वैष्णवी सिद्धेश्वर (B.Sc T.Y.)स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी वर्तमान काळातील आर्थिक, औद्योगिक आणि शैक्षणिक विषयांवर सखोल अभ्यास केला असल्याचे दिसून आले. परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या विचारशक्ती आणि आत्मविश्वासाचे कौतुक केले.या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य, आत्मविश्वास आणि विश्लेषणात्मक विचारसरणी वाढीस लागली, असे प्राचार्य डॉ. कविता प्राशर यांनी म्हटले.

## नाशिकहून दिल्लीसाठी दिवसातून आता दोन वेळा विमानसेवा





**नाशिक**नाशिक-दिल्ली ही आठवड्यातून तीनच दिवसांवर मर्यादित करण्यात आलेली विमानसेवा आता पूर्ववत करण्यात आली असून ही सेवा आता दररोज दिवसांतून दोन वेळा उपलब्ध असणार आहे. त्यामुळे नाशिक दिल्ली प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा फायदा होणार आहे.

नवी दिल्ली विमानतळावरील Runway (10/28) या धावपट्टीचे काम १५ जूनपासून सुरू करण्यात आल्याने नाशिक-नवी दिल्ली विमानसेवा रोजऐवजी आठवड्यातून तीनच दिवस इतकी कमी करण्यात आली होती. यामुळे नाशिकहून दिल्लीला जाणारे पर्यटक, नियमितपणे ये-जा करणारे व्यावसायिक यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत होती. या अनुषंगाने राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री किंजेझारापू राममोहन नायडू यांना १२ जुलै २०२५ रोजी पत्र लिहून नाशिक-दिल्ली विमान सेवा पुन्हा पूर्वीप्रमाणे सुरू करण्याची मागणी केली होती.

सप्टेंबर 2025 मध्ये AAI मुख्यालय, नवी दिल्ली येथे 27 ऑक्टोबर 2025 ते 29 मार्च 2026 या वेळापत्रकासाठी स्लॉट्स निश्चित करण्याची बैठक होणार होती. यात विमान कंपन्या, विमानतळ ऑपरेटर आणि नागरी उड्डाण क्षेत्रातील घटक सहभागी होणार होते. या बैठकीत नाशिक-दिल्ली विमानसेवा पूर्ववत करणे हा विषय समाविष्ट करावा, तसेच ही सेवा Domestic Winter Schedule 2025 (WS 24) मध्ये पुन्हा सुरु करून दररोजची विमान सेवा चालू करावी, अशी मंत्री छगन भुजबळ यांची मागणी होती.

आता नवी दिल्ली विमानतळावरील धावपट्टीचे काम पूर्ण झाल्याने इंडिगो विमान कंपनीकडून २६ ऑक्टोबरपासून दिल्लीसाठी दररोज दोन वेळा विमानसेवा सुरु करण्याची घोषणा करण्यात आली आहे, ही अतिशय आनंदाची बाब आहे. यामुळे नाशिक ते दिल्ली असा विमानप्रवास करणाऱ्या प्रवाशांना खूप मोठा दिलासा मिळणार आहे.

१८० आसनांचे हे विमान असेल, उद्योजक आणि व्यावसायिकांसाठी प्रामुख्याने या विमानसेवेचा लाभ होणार आहे. एका दिवसात दिल्लीतील कामे उरकून नाशिकमध्ये परत येणे व्यापारी, व्यावसायिक यांना शक्य होणार आहे. तसेच नाशिकमध्ये विविध पर्यटन कंपन्या कार्यरत आहेत. उत्तर भारतातील पर्यटनस्थळी जाण्यासाठी पर्यटन कंपन्यांना नाशिकहून थेट दिल्ली विमानसेवा फायदेशीर पडणार आहे.

कुंभमेळ्यासाठी 25 कोटींपेक्षा अधिक भाविक गोदावरीच्या तीरावर येणार आहेत. त्यामुळे आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर देखील ही विमानसेवा महत्त्वाची ठरणार आहे. कुंभमेळ्यात उत्तर भारतातून नाशिक, त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या भाविकांसाठी या विमानसेवेचा लाभ होणार आहे.

नाशिक हळूहळू देशातील सर्वच प्रमुख शहरांशी विमानसेवेने जोडले जात आहे. नवी दिल्ली, हैदराबाद, गोवा, नागपूर, बेंगळूरू, अहमदाबाद आदी ठिकाणांसाठी ही विमानसेवा आहे. काही महिन्यांपूर्वी नाशिक-इंदूर-जयपूर विमानसेवा खंडित झाली होती. त्यामुळे मध्य प्रदेश आणि राजस्थान येथे पर्यटनासाठी जाणाऱ्यांची गैरसोय झाली होती. परंतु, आता इंडिगो कंपनीच्या वतीने २८ ऑक्टोबरपासून आठवड्यात दर मंगळवार, गुरुवार, शनिवार रोजी नाशिक-इंदूर-जयपूर आणि नाशिक-हैदराबाद अतिरिक्त विमान देखील सुरू करण्यात येणार आहे.

नाशिक हे देशातील एक वेगाने विकसित होणारे शहर असून या ठिकाणाहून देशाच्या विविध भागांमध्ये वेगवेगळ्या कारणास्तव ये-जा करणाऱ्या प्रवाशांची संख्या झपाट्याने वाढते आहे. त्यामुळे हे विमानतळ अधिकाधिक सुसज्ज करण्यासाठी तसेच जास्तीत जास्त शहरांना जोडले जाण्यासाठी मंत्री छगन भुजबळ हे सातत्याने प्रयत्नशील आहेत.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०६ ऑक्टोबर २०२५


# भारतातील वृद्धांविरुद्धचे गुन्हे : NCRB अहवालानुसार समाजशास्त्रीय विवेचन - डॉ. राजेंद्र बगाटे



**भा**रताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेत वृद्धांना आदर, संरक्षण आणि कुटुंबीय जबाबदारीचे स्थान दिले गेले आहे; परंतु अलीकडील राष्ट्रीय गुन्हे नोंदणी संचालनालयाच्या (NCRB-2023) आहवालातील आकडेवारीने आणि त्यावर आधारित विविध माध्यमांच्या अभ्यासाने दर्शविले आहे की वृद्धांविरुद्ध होणाऱ्या अत्याचारांचे स्वरूप, प्रमाण आणि प्रसार यामध्ये लक्षणीय बदल होत आहेत. हे बदल फक्त वैयक्तिक पातळीवरील गुन्हेगिरीचे स्वरूप नाहीत, तर त्या समाजाच्या कुटुंबसंरचना, आर्थिक व्यवस्था, तंत्रज्ञानवापर आणि प्रशासनाच्या प्रतिसादाचे प्रतिबिंब आहेत. 2023 मध्ये देशात वृद्धांविरुद्ध नोंदवलेल्या गुन्हे प्रकरणांची एकूण संख्या 27,886 इतकी नोंदली गेली आहे, जी 2022 मधील वृद्धांविरुद्ध नोंदवलेल्या 28,545 गुन्हे प्रकरणांपेक्षा किंचित घट दर्शवते; मात्र हा सांख्यिकीय आकडा स्वतःमध्ये धोका कमी झाल्याचे दर्शवितो असे मानण्यासारखे नाही तर खरं चित्र खोल आणि मिश्र आहे कारण घट असलेल्या काही घटकांच्या पलीकडे गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण, राज्यनिहाय भिन्नता आणि डिजिटल व आर्थिक फसवणुकीत वाढ अशी धोकादायक प्रवृत्त्या दिसून येत आहेत. या आकडेवारीच्या प्राथमिक विश्लेषणात दिसते की वृद्धांविरुद्ध नोंदलेल्या गुन्ह्यांमध्ये सर्वाधिक प्रमाण 'साधे दुखापत' किंवा शारीरिक अत्याचारांचे आहे, परंतु त्याचवेळी चोरी, ठगी/बनावट/फसवणूक आणि आर्थिक शोषण या आर्थिक स्वरूपाच्या गुन्ह्यांनी मोठ्या प्रमाणावर वृद्धांना लक्ष्य केले आहे, हे विशेषतः महत्त्वाचे आहे कारण आर्थिक शोषण हे वृद्धांची आत्मनिर्भरता आणि मानसिक स्वास्थ्य यांना परावृत्त करते व सामाजिक पुनर्वसन ही कठीण करते. राज्यस्तरावरचे विश्लेषण असे दर्शवते की काही राज्ये आणि महानगर वारंवार उच्च नोंदीसह समोर येत आहेत; NCRB-आधारित 2023 आकडेवारीनुसार मध्यप्रदेशमध्ये 5,738 प्रकरणे नोंदली गेली आणि महाराष्ट्रात 5,115 प्रकरणे नोंदली गेली, तर तमिळनाडू व कर्नाटकसह इतर काही राज्यांतही वृद्धांविरुद्ध प्रकरणांचे प्रमाण उच्च राहिले आहे. यामुळे ह्या प्रदेशांतील स्थानिक सामाजिक रचना, कुटुंबीय संघर्ष, आर्थिक असमानता आणि पोलीस व प्रशासनाच्या प्रतिसादातील फरक या सर्वांचा सखोल अभ्यास आवश्यक होतो. महानगरांमध्येही वृद्धांविरुद्धचे गुन्हे महत्त्वाचे आहेत; दिल्ली, बेंगळूरू आणि मुंबई यांसारख्या शहरांमध्ये वृद्धांविरुद्ध नोंदवलेली प्रकरणे वारंवार उच्च आढळतात व मोठ्या शहरांतील विभक्त कुटुंबसंरचना, सामाजिक अलगापन व सार्वजनिक ठिकाणी असलेली असुरक्षितता यांचा वृद्धांच्या अतीव संवेदनशीलतेशी सुसंगत संबंध आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने ह्या समस्येचे मूळ अनेक स्तरांवर आहे. पहिले आणि सर्वात थेट कारण म्हणजे कुटुंबरचना आणि पिढीगत बदल—पारंपरिक संयुक्त कुटुंबापासून विभक्त आणि एकल-व्यक्ती कुटुंबाकडे गेलेली बदलती प्रवृत्ती वृद्धांना वैयक्तिक तसेच सामाजिक आधारापासून वंचित करते; ज्यामुळे अनेक वृद्ध एकटेपणाचा अनुभव घेतात, नियमित सामाजिक निरीक्षण कमी होत म्हणून शारीरिक आणि आर्थिक शोषणाचे धोके वाढतात. दुसरे कारण, आर्थिक असुरक्षितता—अनेक ज्येष्ठ नागरिकांचे उत्पन्न मर्यादित पेन्शन, बचत वा कौटुंबिक अवलंबित्वावर अवलंबून असते; अशा आर्थिक निर्भरतेमुळे ते नातेवाईकांद्वारे होणाऱ्या दडपणाचे आणि मालमत्तेवरील दबावाचे लक्ष्य बनतात. तिसरे कारण, सामाजिक प्रतिष्ठेच्या अभावामुळे वृद्धांचे स्थान कमी झाले आहे; कामावरून निवृत्त झालेल्या व्यक्तींना कुटुंबात व समुदायात कमी महत्त्व दिले जाणे, त्यांची मते दुर्लक्षित होणे आणि निर्णय प्रक्रियेपासून त्यांना वगळणे ह्या सर्वांचा मानसिक व सामाजिक परिणाम गंभीर स्वरूपाचा असतो. चौथे कारण, तंत्रज्ञान आणि डिजिटलीकरणामुळे निर्माण झालेले नवीन प्रकारचे धोके—ऑनलाइन बँकिंग, मोबाइल पेमेंट्स, ओटीपी व कॉल स्कॅम्स यांनी वृद्धांना आर्थिक फसवणुकीसाठी अतिशय संवेदनशील केले आहे; त्यांची डिजिटल साक्षरतेची कमतरता आणि अगदी विश्वसनीय वाटणाऱ्या प्लॅटफॉर्म्सचा गैरवापर या प्रक्रियेला चालना देतो. पाचवे आणि अत्यंत निर्णायक कारण म्हणजे न्यायप्रणाली आणि अंमलबजावणीच्या प्रक्रियेत असलेली कमकुवतता—जरी Maintenance and Welfare of Parents and Senior Citizens Act, 2007 सारखे कायदे अस्तित्वात असले तरी प्रत्यक्ष तक्रार नोंदविणे, पोलिसांच्या संवेदनशीलतेची कमतरता, आरोग्यामुळे पोलीस ठाण्यापर्यंत पोहचण्याची अडचण आणि न्यायप्रक्रियेतील मंदगती या सर्वांमुळे अनेक प्रकरणे कागदोपत्री नोंदही होत नाहीत आणि जे नोंदले जातात त्यांची तपासणी व दोषसिद्धी हळूहळू होते, ज्यामुळे पीडितांना न्याय मिळण्याचा विश्वास कमी होतो. विशेषतः आर्थिक स्वरूपाचे गुन्हे ठगी, बनावट व्यवहार, फसवणूक आणि बँकिंग-आधारित ठगी यांची वाढ ही काळजीची बाब आहे कारण ती वृद्धांच्या आर्थिक सुरक्षिततेवर थेट हल्ला करते. NCRB आणि माध्यमिक अहवालातील आकडे दाखवतात की महानगरांमधील आणि काही राज्यांमधील तज्ञ प्रकारात फसवणूक आणि बनावट व्यवहार मोठ्या प्रमाणात नोंदले गेले आहेत; अनेकदा पेन्शन खाते, बँक डिटेल्स, ओटीपी किंवा विश्वासार्ह वाटणाऱ्या कॉल्सद्वारे पैसे हस्तांतरित करण्याची सवय वापरून अनेक वृद्ध मोठ्या आर्थिक नुकसानाला सामोरे गेले. या प्रकारच्या गुन्ह्यांचा परिणाम तत्कालीन वित्तीय नुकसानांव्यतिरिक्त दीर्घकालीन मानसिक ताण, सामाजिक शत्रुता व आत्मसन्मान घट असतो. काही प्रकरणांमध्ये कोणत्याही आर्थिक मदतीला पुनरागमन कठीण ठरते आणि वृद्धांचे जीवनमान लक्षणीयरीत्या खालावत. शारीरिक अत्याचार आणि घरगुती हिंसाचाराचे स्वरूपही व्यापक आहे; अहवालात 'साधे दुखापत' या श्रेणीतील प्रकरणांची उच्च संख्या दाखवली गेली असून, घरातील कलह, पैशांसाठीचे वाद, वारसाहक्काचे तंटे किंवा जीवनसाथी/कुटुंबातील सदस्यांद्वारे होत असलेले दुर्व्यवहार ही कारणे अनेकदा समोर येतात. विशेषतः जिथे वृद्धांची आरोग्यदृष्टीने निर्भरता जास्त असते आणि सामाजिक-पारंपरिक आधार कमी झालेला असतो, तिथे घरगुती हिंसा आणि परित्यागाचे प्रकार वाढतात. येथे राज्यानिहाय फरकांचे निरीक्षण करणे आवश्यक आहे कारण ती समाजशास्त्रीय आणि प्रशासकीय निकष प्रतिबिंबित करतात. मध्यप्रदेशमध्ये 2023 मध्ये नोंदवलेली 5,738 प्रकरणे आणि महाराष्ट्रातल्या 5,115 प्रकरणांमधून दिसते की मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र या प्रदेशांमध्ये वृद्धांच्या सुरक्षेशी संबंधित समस्यांचे प्रमाण जास्त आहे. यामागील कारणांमध्ये स्थानिक कुटुंबीय संदर्भ, आर्थिक ताणतणाव, जिल्हास्तरीय रोजगार अवस्था, शहरीकरण आणि स्थानिक पोलीस व्यवस्थेची कार्यक्षमता ह्यांचा समावेश असू शकतो. तसेच छत्तीसगडसारख्या काही राज्यांत वृद्ध हत्येचे दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त असल्याचे नोंदले गेले आहे, ज्यामुळे गंभीर गुन्ह्यांचा स्थानिक पॅटर्न समजून घेणे आवश्यक ठरते. महानगरांमध्ये दिल्ली, मुंबई आणि बेंगळूरू यांसारख्या शहरांमध्ये वृद्धांविरुद्धच्या प्रकरणांमध्ये उत्पन्न होत असलेले बदल आणि काही शहरांमध्ये झालेली वाढ हे सूचित करतात की शहरीकृत जीवनशैलीचा वृद्धांच्या सामाजिक सुरक्षा व सहभागावर प्रतिकूल परिणाम होत आहे. या परिस्थितीत सामाजिक आणि प्रशासकीय उपाय यांची गरज तातडीची आहे आणि ते उपाय बहुआयामी असावे लागतील. कायदा आणि न्यायप्रणालीच्या पातळीवर FIR नोंदणीचे नियम सुलभ करणे (उदा. घरबसल्या FIR नोंदणी, मोबाइल पोलीस सेवा), वरिष्ठ नागरिकांसाठी विशेष हेल्पडेस्कची स्थापना, पोलिस प्रशिक्षणामध्ये वयोवृद्ध संवेदनशीलता समाविष्ट करणे आणि त्वरित वैद्यकीय व मानसिक सहाय्य उपलब्ध करून देणे हे प्राथमिक पावले असावीत. स्थानिक पातळीवर 'वयोवृद्ध सुरक्षा समित्या' वा 'वृद्ध सुरक्षा युनिट्स' ची स्थापना करणे जिथे समाजकार्य, पोलीस, आरोग्य व कायद्यातील प्रतिनिधी एकत्र येऊन स्थानिक समस्यांचा वेळीच शोध घेतील आणि तातडीची मदत पुरवतील अशी यंत्रणा प्रभावी ठरू शकते. आर्थिक सुरक्षेसाठी पेन्शन योजनांचे पारदर्शक व वेगवान वितरण, वयोवृद्धांना लक्षित आरोग्य विमा व आर्थिक साक्षरता कार्यक्रम, तसेच बँक आणि नान-बँक आर्थिक संस्थांकडून वृद्धांसाठी व्यवहार पुष्टीकरणाची विशेष पद्धत लागू करणे हे देखील आवश्यक आहे; या पद्धतींमुळे सायबर-ठगी व ऑनलाइन फसवणुकीवरही परिणाम होऊ शकेल. समाजशास्त्रीय बदल घडविणे म्हणजे दीर्घकालीन काम यासाठी माध्यमे, शाळा-शिक्षण संस्था आणि समुदाय-नियोजकांची भूमिका निर्णायक आहे. माध्यमांनी वृद्धांचे सकारात्मक योगदान आणि त्यांचे अनुभव प्रदर्शित करून समाजातील वृद्धांविषयीचे नकारात्मक पूर्वग्रह तोडण्याचे काम केले पाहिजे; शाळांमध्ये 'वृद्ध सन्मान' किंवा अनुभव-विनिमय कार्यक्रम राबवून तरुण पिढीमध्ये वृद्धांविषयी आदर आणि जबाबदारीची भावना रुजवावी लागेल; तसेच स्थानिक समाजस्तरावर स्वयंसेवी उपक्रम, स्थानिक क्लब व सांस्कृतिक संस्थांद्वारे वृद्धांना सक्रियपणे सहभागी करून घेण्याचे कार्यक्रम राबविले तर वृद्धाचा सामाजिक सहभाग आणि आत्मसन्मान वाढेल, ज्यामुळे शोषणासाठी सामाजिक जागा कमी होतील. याशिवाय सामाजिक निर्बंध, कुटुंबीय दायित्वांची पुनर्बांधणी आणि आर्थिक सहभाग वृद्धांना अधिक सक्षम करतील. महत्त्वाचे म्हणजे NCRB कडून प्रकाशित झालेली आकडेवारी ही केवळ दिशादर्शक आहे पण वास्तविकतेतील अनेक प्रकरणे नोंद न झाल्यामुळे ती पूर्ण चित्र दर्शवत नाहीत. अनेक वृद्ध सामाजिक लज्जा, कुटुंबीय दबाव किंवा आरोग्य कारणास्तव तक्रार नोंदवण्यापासून दूर राहतात; म्हणून स्थानिक स्तरावर सर्वेक्षण, नागरिकसमूहांकडून गोळा केलेला अनुभव आणि स्वयंसेवी संस्थांचा डेटा धोरणनिर्मितीत समाविष्ट करणे आवश्यक आहे, ज्यायोगे संख्यात्मक डेटाच्या पलीकडे असलेल्या सामाजिक वास्तवाचा अभ्यास करता येईल. तसेच दोषारोप सिद्धी आणि शिक्षा प्रक्रियेत वेग आणणे हे देखील गरजेचे आहे कारण आरोपींना योग्य वेळी शिक्षा न मिळाल्यास पुनरावृत्तीची शक्यता वाढते आणि पीडितांचा न्यायप्रणालीवरील विश्वास ढासळतो. शेवटी, निष्कर्ष म्हणून असे म्हणता येईल की NCRB च्या ताज्या आकडेवारीने जे द्योतक दर्शविले आहेत. राज्यनिहाय फरक, महानगरांमधील धोके, आर्थिक व डिजिटल फसवणुकीची वाढ आणि घरगुती हिंसाचाराचे विषारी स्वरूप हे केवळ तात्पुरते सामाजिक प्रश्न नाहीत, तर व्यापक धोरणात्मक, प्रशासकीय आणि सांस्कृतिक हस्तक्षेपांची गरज ओळखून तीव्रपणे हाताळली पाहिजे. जर शासन, स्थानिक संस्था, बँका, शैक्षणिक संस्था आणि माध्यमे यांनी समन्वित प्रयत्न केले तर वृद्धांना केवळ कायदा आणि पोलिस संरक्षण नसून, आर्थिक सुरक्षितता, डिजिटल साक्षरता, मानसिक आरोग्य समर्थन आणि सामाजिक प्रतिष्ठा ह्या सर्व बाजूंनी बळकटी मिळू शकते. यामुळे वृद्धांचा सन्मान आणि सुरक्षितता सुनिश्चित होईल आणि समाजाचे नैतिक व सामाजिक आरोग्य सुधारले जाईल. NCRB च्या अहवालाने वाजवलेली या संदर्भातील धोक्याची घंटा जर आपण ऐकली आणि धाडसाने काम केले तरच आमचे ज्येष्ठ नागरिक सुरक्षित, सन्मानित आणि सहभागी जीवन जगण्यासाठी स्वायत्त होतील; अन्यथा या आकडेवारीमागील गंभीर संकेत दीर्घकाळासाठी समाजाला मोलाचे नुकसान करू शकतात.


**डॉ. राजेंद्र बगाटे,**

(लेखक, समाजशास्त्र आणि वृद्धत्वशास्त्राचे अभ्यासक आहेत)

मो. 9960103582

ईमेल bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०६ ऑक्टोबर २०२५

# पिशोर माझं गाव

घाटावर वसलेलं
पिशोर माझं गाव...

घाटमाथ्याचं भूषण
माझ्या घाटबोलीचा मला अभिमान
साहित्य लेखणीला जन्म दिला मातीनं
माझ्या मातीला राजकीय ठसा
कलावंत वसेचा भाव
घाटावर वसलेलं पिशोर माझं गाव...

अख्ख्या महाराष्ट्राला ओळख
आमच्या चिकू आणि गुळाची
गुळवाणी गोड माझ्या घाटावरची माणसं
बागायती क्षेत्र आमचं
बाराही महिने डोले हिरवळ रानात
घाटावर वसलेलं पिशोर माझं गाव...

विकास महर्षी रायभान भाऊंची पुण्याई
अंजना पळशी प्रकल्पाची अंजना नदीवर नवलाई
घाटमाथ्यावर पहिली शाळा माध्यमिक
तुकाराम पाटील अन्
एकनाथ काकांची पुण्याई
भुयारी सोनगिरी आकर्षण गावाचं
सटीआईचा तिथे आहे हो निवास
सटीआईच्या बाजूला कालेखा मियाचा दरबार
सिद्धेश्वराच्या दारात सय्यद शाहा मियाचा दरबार
राजवाड्यात उभा भीमराव आंबेडकर
कोळी समाज करे येथे मच्छीमार
१९९८ ला उतरविले भुजबळांनी हेलिकॉप्टर
विधानसभेवर महिलांचीही राजकीय नेतृत्व
घाटावर वसलेलं पिशोर माझं गाव...

कॉम्रेड सुदाम भाऊ एक होतं वादळ
कामगार,कष्टकरी शेतकऱ्यांच्या हिताचा आवाज
नगरपालिका श्रेणीचं आहे माझं गाव
घाटावर वसलेलं पिशोर माझं गाव...

हिराजी बाबा ग्रामदैवत
रक्षणास उभी विंध्यवासिनी माता राशावर
राशाच्या पायथ्याला गयबनशावली गुपीत बाबा
करी सर्व जाती धर्मीयांचे दुःख निवारण
हिराजी बाबा,गुपीत बाबा ,गवळी बाबा
ऋषी बाबा ,महादू बाबा
शफीयाबादचे गंधू बाबा
मोठ्या मळ्यात यशवंत बाबा
मोगऱ्या मळ्यात माउंजी बाबा
ईनामत मळ्यात बुढाजी बाबा
मोकासरे मळ्यात वंजारी बाबा
पांढरी वरचा वालहूबाबा
ही माणसं गावाची दैवत
मोतीगीर बाबाची भरे येथे यात्रा
शिवगीर बाबाच्या हयातीत
रमतो भक्त भक्तिमय मेळयात
बंगाली पिशोर ह्याची जुनी ओळख
घाटावर वसलेलं पिशोर माझं गाव...

गुढीपाडव्याच्या पाचीला
भरे यात्रा हिराजी बाबाची
बारा गाड्या ओढती नवसे भक्तमंडळी
बळी बकऱ्याची देऊन नवस फेडती
चिकूच्या बागात उठती कंदोरीच्या पंगती
रेवड्या उधळून खिळे भक्तांचा भक्ती भाव
घाटावर वसलेलं पिशोर माझं गाव...

एक खांबी हेमाडपंती कपिलेश्वर
खडकी स्मशानात हेमाडपंती रत्नेश्वर
सोनगिरीच्या पायथ्याला हेमाडपंती सिध्देश्वर
अंजना नदीवर रामेश्वर वस्तीचा महादेव रामेश्वर
अंजना,खडकी,कोळंबी त्रिगुणी संगमी वसला
मळीतला महादेव मुगदेश्वर
लोटणंवाडीचा महादेव आम्रेश्वर
कोळंबी रोडवर महादेव भस्मेश्वर
दुर्डीच्या बेटाजवळ शक्तीखांब
शक्तीखांबाचा स्वामी सिद्धेश्वर
खडकी काठी चैतन्य कानिफनाथ मंदिर
सैतूक मळ्यात संतोषी मातेच मंदिर
बाजारपट्टीत लक्ष्मी आईचं मंदिर
डिगरामधी सावता माळी ,संत ज्ञानेश्वर
म्हैसमाळची गिरिजाई निवासी देवमाळावर
जाधव गल्लीत उभा मोठा गणपती
शफेपूरातला जागृत मारुती
गावच्या फाट्यावरची देवीआई पाठी
घाटावर वसलेलं पिशोर माझं गाव...

दऱ्या,खोऱ्या,नदी नाले
वृक्षवेली,हिरवी राने
निसर्ग सौंदर्यात नटलेलं
मनाला मोहनार मोहंद्री गाव
मोहंद्री सिटी त्याच आधुनिक नाव
मोहंद्री बांडी खोरा धण्यात
जणू तपाला बसला धनेश्वर महादेव
घाटावर वसलेलं पिशोर माझं गाव...

निजामशाहीची हुकूमशाही
त्यात जन्मली रझाकारी मातशाही
तुफान काठेवाडी घोड्यावर होऊन स्वार
काकासाहेब देशमुखाने केले रझाकार ठार
सोबतीला वसंतराव देशमुख अन्
बाळा पाटील रझाकारी बंडखोर
कापून रझाकार विहिरी भरल्याचे साक्षीदार
मोराच्या हवेलीचा खुशालराव पाटील
अन् यशवंतराव पाटील वतनदार
मोठा थाट,मोठा रुबाब,धनवान हवेलीच नाव
घाटावर वसलेलं पिशोर माझं गाव...

धनगर माळेगाव,पळशी,ठोकळ माळेगाव
भिलदरी,गौरपिंपरी,मोहाडी ही सारी गाव
माझ्या गावाच्या सीमा रेषेवरची नाव
गोलाकार वेढ्यांनी वेढलेलं माझं गाव
घाटावर वसलेलं पिशोर माझं गाव...

बहुजन समाजाचा इथे गोतावळा
गुण गोविंदाने फुलतो एकतेचा मळा
माझ्या गावातूनी जाई डोंगररांगा सातमाळा
वेरुळ अंजिठ्याला जोडणारा गाव माझा दुवा
पिशोर ,वाघुळखेडा,शफेपूर,डिगर,कजबा
पिशोर गावाची ओळख सांगे ही पाच गाव
पाच गावाला पाच वेशी,पाच वेशीला पाच मारुती
चहूबाजूंनी गावाला मह्या डोंगरांचा वेढा
वाडी खोरा, बिरुबा खोरा,आईचा खोरा
काळदात ,धनगर माळेगाव ,बांडी खोरा
साखरी खोरा ,उंट मारी खोरी,सीता खोरी
आगोशा ,वाघदरा ,देवमाळ ,गाढव माळ
ही सारी गावच्या उत्तरेची माळरानांची नावं
घाटावर वसलेलं पिशोर माझं गाव...

पश्चिमेला पळशी गावचा झिंग्गीचा खोरा
कातर खुशी खोऱ्याचा माझ्या गावाला येटाळा
दक्षिणेला ठोकळ माळेगाव उभा सोबतीला
लोखंडी माळेगाव,साळेगाव हेही संगतीला
ठोकळ माळावरच्या पवनचक्क्या
वाढवी गावाच्या तंत्रज्ञानाची वाव
घाटावर वसलेलं पिशोर माझं गाव...

दक्षिणेला भिलदरी गाव माझ्या गावाच्या सिमेवर
राजन खोऱ्यावर लक्ष्मी मातेचा साक्षात्कार
बाप्पा श्री गणेश,भिलदरी राशाच्या टेकडीवर
ऋषीधाव खोरा,सुनाळवाडीच्या माळावर
जय राणा गणेश मंदिर
सधन शेतकऱ्यांचे भिलदरी गाव
घाटावर वसलेलं पिशोर माझं गाव...

दक्षिणेच्या गौरपिंपरीतून जाई बडवाळीचा डोंगर
तिथे भवानी मातेचं मंदिर
चौकी माळ,कानवाळी माळ,खालता माळ
पूर्वेला नादरपूर,जवखेडा,मोहाडी गाव
मोहाडी माळात भवानी आईचा निवास
मोहाडी खिरच्या माळाला मेळून
हद्द संपते माझ्या गावाची
या गोल डोंगर वेढ्याच्या कुशीमधी
जन्मलेलं माझं गाव
घाटावर वसलेलं पिशोर माझं गाव...

**लक्ष्मण गं.वाल्डे- पिशोरकर**
**( कन्नड )छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं-8888606068**

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी
शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903